महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील अधिका-यांच्या तात्पुरत्या पदोन्नती व पदस्थापना.

**महाराष्ट्र शासन**

वित्त विभाग,

शासन आदेश, क्रमांक :- संलेको २०१७/ प्र.क्र. ८५ /कोषा प्रशा-२

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.दिनांक :- २४ ऑगस्ट, २०१८.

**शासन आदेश :** - महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील खालील विवरणपत्रामध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना सहसंचालक संवर्गात रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनबँडमध्ये, त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या पदावर, त्या पदाचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून केवळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सध्याचे पद | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. विकास विनायकराव देसाई | कोकण- २ | कोकण- २ | वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, बांद्रा, मुंबई |
| २ | श्री. धनराज मदन गरड | कोकण-२ | कोकण-२ | मुख्य लेखाधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई |
| ३ | श्री. जितेंद्र विश्वनाथ कोळंबे | पुणे | पुणे | मुख्य लेखाधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे |
| ४ | श्री. निलेश तुकाराम राजूरकर | नाशिक | नाशिक | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक |
| ५ | श्रीमती मोना कृष्णकुमार ठाकूर | नागपूर | नागपूर | सहसंचालक, स्थानिक निधी लेखा, नागपूर |
| ६ | श्री. नरेंद्र दिगंबर महाजन | औरंगाबाद | औरंगाबाद | मुख्य लेखा व लेखापरिक्षा अधिकारी, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद |
| ७ | श्री. भगवान दत्तात्रय घाडगे | कोकण- २ | कोकण- २ | उपसचिव व सहसंचालक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ८ | श्री. संजय प्रभाकर पतंगे | कोकण- २ | कोकण- २ | उपसचिव, फलनिष्पती, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |

२४/८/१८

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सध्याचे पद | मागणी केलेला महसुली विभाग | वाटप केलेला महसुली विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ९ | श्रीमती स्मिता मनिष कुलकर्णी | कोकण- २ | कोकण- २ | सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई |
| १० | श्रीमती अस्मिता सुधाकर बाजी | कोकण- २ | कोकण- २ | सहसंचालक (सुधारणा), लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई |
| ११ | श्री. राजेश गोपाळराव लांडे | कोकण- २ | कोकण- २ | सहसंचालक (वित्त व लेखा), प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |

२. सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ ब यांनी दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनूसार देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

४. सदरचे पद हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे सदर पदोन्नती / निवडसुची लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

५. वरील अधिका-यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. विहित कालावधीत नियूक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील. तसेच सदर अधिकारी यांनी मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री संचालनालय (ले व को), मुंबई यांनी करावी.

६. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६/२/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रतिनियुक्तीच्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आली आहे.

७. सदर अधिकारी यांना महसुली विभाग वाटप नियमावली २०१५ / शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही २०१७/ प्र.क्र.११४/कार्या-१२, दिनांक १५ जून, २०१७ व दि. १२/४/२०१८ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(माधवी गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत -:

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.

२) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय ,मुंबई *
४) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
५) मा. मुख्यमंत्री / मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) संबंधित अधिकारी *
७) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
८) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख*.
९) प्रधान सचिव (ले व को) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी,कोषा-प्र.१,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) निवड नस्ती. ,कोषा-प्र.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)